**शेतकऱ्यांना टिश्यू कल्चर बांबू रोपे पुरवठा व त्यांच्या देखभालीकरिता अनुदान देण्यासाठी अटल बांबू समृध्दी योजना राबविणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग,**
**शासन निर्णय क्र.बांबूसा-२०२३/प्र.क्र.१०५/फ-९**
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक :- २८ फेब्रुवारी, २०२४

**वाचा :-**

महसूल व वन विभाग, मंत्रालय,मुंबई, शासन निर्णय, क्रमांक : सावनि-२०१८/प्र.क्र.१८४/ फ-११ दिनांक २८.६.२०१९

**प्रस्तावना :-**

बांबू हे एक बहुपयोगी वनउपज असून आर्थिकदृष्टया अत्यंत महत्वाचे असल्यामुळे त्यास “हिरवे सोने” (Green Gold) असे संबोधले जाते. त्याचे गरीबांचे जीवनात व ग्रामीण उद्योगात विशेष स्थान आहे.

बांबू क्षेत्राचा समुचित विकास करणे व या माध्यमातून स्थानिकांचा आर्थिक व सामाजिक विकास साधण्याकरिता केंद्र शासनाने राष्ट्रीय बांबू अभियान (N.B.M.) ची स्थापना केलेली आहे. त्याअनुषंगाने शेतकऱ्यांची उपजिवीका उंचावण्यासाठी शेतजमिनीवर तसेच शेताच्या बांधावर बांबू लागवडीकरिता शेतकऱ्यांना सवलतीच्या दराने टिश्यु कल्चर बांबू रोपांचा पुरवठा करण्यासाठी “अटल बांबू समृध्दी योजना” राबविण्याकरीता मंत्रिमंडळाच्या मान्यतेने शासन निर्णय २८ जून २०१९ रोजी निर्गमित करण्यात आला आहे. या योजनेंतर्गत शेतकऱ्यांनी मागणी केल्यास १ हेक्टर क्षेत्राकरिता ६०० टिश्यु कल्चर रोपे घ्यावयाचे प्रावधान करण्यात आले आहे. तसेच सदर योजनेंतर्गत रोपे लागवड, निंदणी, संरक्षण इत्यादी खर्च मात्र शेतकऱ्यांने करावयाचा होता. रोपांचे किंमतीच्या ८० टक्के किंवा ५० टक्के अनुदान म्हणून अनुक्रमे ४ हे.चे खाली किंवा ४ हे. चे वर भुधारणा असल्यास देय होते. त्यानुसार योजनेंतर्गत बांबू लागवड करण्याकरीता फक्त ६०० रोपे देण्याची तरतूद करण्यात आली होती. मात्र, रोपांचे देखभालीकरीता सदर शासन निर्णयात तरतूद करण्यात आलेली नाही.

राष्ट्रीय बांबू अभियान अंतर्गत बांबू लागवडीकरीता एकुण रु.१२०/- अनुदान ३ वर्षात विभागून द्यावयाचे आहे. त्यामुळे शेतकऱ्याला लागवड, खत, निंदणी या कामासाठी अनुदानातून हातभार लागत आहे. या योजनेला भरपूर प्रतिसाद मिळत आहे. परंतु सदर केंद्र पुरस्कृत योजनेतून अत्यल्प अनुदान उपलब्ध होते.

त्यामुळे राष्ट्रीय बांबू अभियान योजने समरुप अटल बांबू समृध्दी योजने अंतर्गत शेतकऱ्याला बांबू रोपे उपलब्ध करुन देण्यासोबतच खत, निंदणी, पाणी देणे, संरक्षण या कामासाठी अनुदान देणे उचित ठरेल. मागील पाच वर्षात रोजंदारी मजुरीचे वाढलेले दर विचारात घेता, शेतकऱ्यांना रु.१७५/- प्रतीरोप इतके अनुदान ३ वर्षात (रु.९०+ रु.५०+रु.३५) विभागून देण्याची तरतूद केल्यास राज्यात बांबू लागवडीला भरपूर प्रतिसाद मिळून बांबू लागवडीत वाढ होऊन शेतकऱ्याचे उत्पन्नात भरघोस वाढ होईल.

त्यानुषंगाने अटल बांबू समृध्दी योजनेच्या दिनांक २८ जून २०१९ रोजीचा शासन निर्णय अधिक्रमित करुन सदर योजना नव्याने राबविण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

**शासन निर्णय :-**

१. दिनांक २८ जून २०१९ रोजीच्या शासन निर्णयानुसार अटल बांबू समृध्दी योजनेअंतर्गत शेतकऱ्यांना टिश्यू कल्चर बांबू रोपे पुरवठा करण्याची तरतूद होती. तथापि, त्यांच्या देखभालीकरिता अनुदान देण्याची तरतूद सदर योजनेत नसल्यामुळे केंद्र शासनाच्या राष्ट्रीय बांबू अभियान या योजनेच्या धर्तीवर अटल बांबू समृध्दी योजनेअंतर्गत शेतकऱ्यांना टिश्यू कल्चर बांबू रोपे लागवडीकरीता अनुदान देण्याची तरतूद करण्यात येत आहे.

२. दिनांक २८ जून २०१९ रोजीच्या शासन निर्णयानुसार शेतकऱ्याला १ हेक्टरसाठी ६०० रोपे देण्याची तरतूद आहे. तसेच सदर शासन निर्णयात फक्त रोपांचे किमतीपैकी ८० टक्के किंवा ५० टक्के अनुदान लाभार्थ्यांचे भूधारणा मर्यादेनुसार देण्याची तरतुद आहे. रोपवनातील निंदणी, पाणी देणे, खत देणे, संरक्षण इत्यादी करिता तरतूद करण्यात आलेली नाही. त्यामुळे सदर तरतुद रद्द करुन त्याऐवजी २ हेक्टरकरिता १२०० रोपे लागवड व देखाभालीसाठी अनुदान देण्याची तरतूद करण्यात येत आहे.

२. **योजनेचे उद्दीष्ट** :-

अ) शेतक-यांना बांबू लागवडीसाठी अनुदान देणे.

ब) शेतीतून मिळणा-या उत्पन्नाला जोड देण्यासाठी व हवामान बदलास पूर्ण योग्य करण्यासंबंधी सहाय्यभूत होण्यासाठी तसेच उद्योगाच्या दर्जेदार कच्चा मालाच्या आवश्यकतेच्या उपलब्धतेसाठी शेत जमिनीवरील बांबू लागवडी खालील क्षेत्र वाढविणे,

क) बांबू लागवडीमुळे शेतक-यांचे उपजिवीकेचे साधन निर्माण करणे आणि शेतक-यांच्या आर्थिक स्थितीत सुधारणा होऊन त्यांची उपजिवीका उंचावण्यास मदत करणे.

३. **टिश्यू कल्चर बांबू रोपाकरीता प्रजाती**

महाराष्ट्रामध्ये मानवेल *(Dendrucalamus strictus)*, कटांग *(Bambusa bambusa)* या प्रजाती विदर्भ क्षेत्रात तर मानगा *(Oxytenenthara stocksii)* ही प्रजाती ही कोकण क्षेत्रात मोठया प्रमाणात आढळून येते.

बांबू क्षेत्रात बऱ्याच वर्षापासून काम करणाऱ्या तज्ज्ञांसोबत चर्चा करुन वरील ३ स्थानिक प्रजाती व्यतिरिक्त खालील ५ प्रजाती निवडण्यात आलेल्या आहेत.

१) *Bambusa balcooa*
२) *Dendrocalamus brandisii*
३) *Bambusa nutan*
४) *Dendrocalamus asper*
५) *Bambusa tulda*

वरील नमूद बांबूच्या प्रजाती व्यतीरिक्त इतर प्रजातीचा आवश्यकतेनुसार समावेश करण्याचा अधिकार प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख) म.रा.नागपूर यांचे अध्यक्षतेखाली समितीस देण्यात येत आहे.

४. **योजनेच्या सर्वसाधारण तरतूदी :-**

अ) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख) म.रा.नागपूर यांचे अध्यक्षतेखाली स्थापन केलेल्या

समितीने निश्चित केलेल्या दरानुसार टिश्यू कल्चर बांबू रोपांचा पुरवठा केला जाईल.

ब) सदर योजनेअंतर्गत टिश्यू कल्चर बांबू रोपे पुरवठा व त्यांच्या देखभालीकरिता प्रत्येक शेतकऱ्याला तीन वर्षाकरिता प्रति रोपे रु. ३५०/- खर्च अपेक्षित असून त्यापैकी ५०% रक्कम अनुदान म्हणून तीन वर्षात देण्यात येईल. तसेच सदर अनुदानाची विभागणी वर्षनिहाय रु.९०/-+ रु.५०/-+ रु.३५/-= रु. १७५/- याप्रमाणे प्रथम/द्वितीय / तृतीय याप्रमाणे करण्यात येत आहे. पुरवठा करण्यात आलेल्या रोपांची रक्कम अनुदानाचे प्रथम वर्षीय हफ्त्यामधून समायोजीत करण्यात यावी.

क) सदर योजनेअंतर्गत एका शेतकऱ्याला २ हेक्टर क्षेत्राकरीता ६०० रोपे प्रति हेक्टर याप्रमाणे एकुण १२०० बांबू रोपे (५x४ मी. अंतरावर) लागवड व देखभालीकरीता अनुदान देण्यात येईल.

ड) लाभार्थ्यांची निवड करताना शेतकरी उत्पादक संस्था/कंपनी/ बांबू शेतकऱ्यांचा समूह यातील सभासदांना एकत्रित अर्ज केल्यास त्यांना प्राधान्य देण्यात येईल. तद्नंतर खाजगी शेतकऱ्यांकडून/एकएकट्या शेतकऱ्यांच्या प्राप्त होणाऱ्या अर्जाचा विचार केला जाईल. वरील अनुदान दोन हेक्टर पर्यंत सर्व शेतकऱ्यांना देय राहील.

इ) अटल बांबू समृध्दी योजनेच्या अंमलबजावणीकरीता प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख) म.रा.नागपूर यांचे अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात येत असून, सदर समितीमध्ये खालील सदस्याची नियुक्ती करण्यात येत आहे.

| | |
|---|---|
| प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख) म.रा.नागपूर | अध्यक्ष |
| प्रधान मुख्य वनसंरक्षक (उत्पादन व व्यवस्थापन) म.रा.नागपूर | सदस्य |
| अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास) म.रा.नागपूर | सदस्य |
| व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र बांबू विकास मंडळ, नागपूर | सदस्य सचिव |

वरील समितीमार्फत अटल बांबू समृध्दी योजना राबविण्यासाठी बांबू रोपांचा पुरवठा करण्यासाठी ई-निविदाद्वारे प्राप्त दरांचे मुल्यमापन करून प्रतिवर्षी दर निश्चित करणे, लाभार्थी निवडीचे निकष, अंमलबजावणीची पध्दत, सनियंत्रण व मुल्यमापन करणे व इतर अनुषंगिक बाबीवर मार्गदर्शक सूचना निर्गमित कराव्यात.

ई) सदर योजना व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र बांबू विकास मंडळ, नागपूर यांचेमार्फत राबविण्यात येईल.

५. सदर योजनेंतर्गतचा खर्च हा प्रधानशिर्ष- ४४०६-वनीकरण व वन्यजीव यावरील भांडवली खर्च (००) (०६) सामुहीक पातळीवर ठोस रोपवन वनीकरणाचा भरगच्च कार्यक्रम (४४०६-०४९२) या लेखाशिर्षाखाली उपलब्ध असलेल्या अनुदानातून भागविण्यात यावा.

६. सदर शासन निर्णय मा. मंत्रीमंडळाच्या दि. ०५.०२.२०२४ रोजी झालेल्या बैठकीत मिळालेल्या मान्यतेनुसार आणि सदर शासन निर्णय नियोजन विभागाच्या अ.नौ.सं.क्र.६८/१४७५,दि.०१.१२.२०२३ अन्वये व वित्त विभागाच्या अनौ.सं.क्र.३८८/२०२३/व्यय-१०, दिनांक ०७.१२.२०२३ अन्वये प्राप्त सहमतीनुसार तसेच वित्त विभागाच्या दिनांक १२.०४.२०२३ रोजीचे परिपत्रक आणि वित्त विभागाच्या शासन निर्णय क्र.विअप्र/२०१३/प्र.क्र.३०/ २०१३/ विनिमय, भाग-२, दिनांक १७.४.२०१५ अन्वये विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारास अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२४०२२८१७२७४२४५१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

VENUGOPAL REDDY BOLLAVARAM

Digitally signed by VENUGOPAL REDDY BOLLAVARAM
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FOREST DEPARTMENT,
2.5.4.20=97575b20152cd7d6140b21e873943cf8e0b594f98f7d940a604a875057f9a5c5, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=ADC518D1EC700B3AD7386666A2EAA0C03E0791D886CF553BBCC7819653DDCF29, cn=VENUGOPAL REDDY BOLLAVARAM
Date: 2024.02.28 17:38:41 +05'30'

**( बी. वेणुगोपाल रेड्डी )**
**प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य, यांचे प्रधान सचिव, राजभवन, मुंबई
२. मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा. उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, (गृह, विधी व न्याय) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई
४. मा. उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, (वित्त व नियोजन) यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
५. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई
६. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव सर्व मंत्रालयीन विभाग.
७. प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई (विधानपरिषद)
८. प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई (विधानसभा)
९. सर्व मा. मंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
१०. मा. विरोधी पक्ष नेता, विधानपरिषद/विधानसभा
११. सर्व सन्माननीय विधानसभा/विधानपरिषद सदस्य.
१२. सर्व विभागीय आयुक्त.
१३. आयुक्त (कृषी), महाराष्ट्र राज्य, पुणे.
१४. आयुक्त, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना-महाराष्ट्र, नागपूर
१५. सर्व जिल्हाधिकारी.
१६. सर्व मुख्य कार्यकारी, जिल्हा परिषद.
१७. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख),महाराष्ट्र राज्य, नागपूर.
१८. प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
१९. प्रधान मुख्य वनसंरक्षक (सामाजिक वनीकरण), महाराष्ट्र राज्य, पुणे.
२०. प्रधान मुख्य वनसंरक्षक (उत्पादन व व्यवस्थापन), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
२१. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र वन विकास मंडळ मर्यादित, नागपूर.
२२. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (संशोधन, शिक्षण व प्रशिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे.
२३. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र बांबू प्रवर्तन प्रतिष्ठान, मुंबई.
२४. सर्व मुख्य वनसंरक्षक.
२५. संचालक, फलोत्पादन, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२६. संचालक, खादी व ग्रामोद्योग मंडळ, मुंबई.
२७. संचालक, उद्योग संचालनालय, मुंबई.

२८. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र बांबू विकास मंडळ, नागपूर.
२९. महालेखापाल (लेखापरिक्षा) महाराष्ट्र १/२, मुंबई व नागपूर.
३०. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र १/२, मुंबई व नागपूर.
३१. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.
३२. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई-३२.
३३. निवासी परिक्षा लेखा अधिकारी,मुंबई
३४. मुख्य वनसंरक्षक (मंत्रालय), मुंबई
३५. वनसरंक्षक, सामाजिक वनीकरण (६ वृत्त)
३६. उप वनसंरक्षक (प्रा) (सर्व)/विभागीय वन अधिकारी (प्रा)/उपविभागीय वन अधिकारी (प्रा)
३७. विभागीय वन अधिकारी, सामाजिक वनीकरण (सर्व जिल्हे)
३८. वित्त विभाग, व्यय-१०, अर्थसंकल्प-०६ मंत्रालय, मुंबई-३२
३९. नियोजन विभाग, का.१४७५, मंत्रालय, मुंबई-३२
४०. कार्यासन अधिकारी, फ-२,महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
४१. कार्यासन अधिकारी, ब-१,महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
४२. सह सचिव/उप सचिव/अवर सचिव/कार्यासन अधिकारी, महसूल व वनविभाग (वने),मंत्रालय, मुंबई-३२.
४३. कार्यासन फ-९/फ-११, महसूल व वनविभाग, मंत्रालय, मुंबई-३२ (निवडनस्ती)